## <u>रे. दि. मु. नं.१३९/२००२ मधील निशाणी २१० व निशाणी २११ वरील आदेश</u>

(मालन दिनकर कुंभार वगैरे विाा पोपट केसू कुंभार वगैरे)

प्रस्तुतचा अर्ज वादींनी प्रतिवादी क्र.५ वैजयंता तात्याबा कुंभार हिचे कायदेशीर वारस मुदतीत अभिलेखावर न घेतलेने झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द होवून मिळणेकरीता व झालेला विलंब माफ होवून मिळण्याकरीता केलेला आहे.

०२. वादींचे अर्जातील कथनानुसार, प्रतिवादी क्र.५ वैजयंता तात्याबा कुंभार ही दिनांक २७.०१.२०२२ रोजी मयत झाली आहे. सदर प्रतिवादी क्र.५ ही शिरवडे, कराड येथे मयत झालेची माहिती वादी यांना तातडीने मिळाली नाही. तसेच वादी यांना प्रतिवादी क्र.५ चा मृत्युचा उतारा उपलब्ध करणे शक्य झाले नाही व वारसांच्या नावाची माहिती उपलब्ध झाली नाही. सदर वादी हे वयोवृध्द व आजारी असलेमुळे माहिती वेळेत उपलब्ध करता आली नाही. तसेच, वादींना वारस रेकॉर्डवर घेणेसंबंधी कायद्याचे ज्ञान नसलेमुळे वादींना प्रतिवादी क्र.५ चे मृत्युची माहिती व त्या संबंधीचे कागदपत्रे व वारसांची माहिती वकीलांना मुदत देता आली नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र.५ चे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी विलंब झाला आहे. दरम्यान तिचे विरुध्द दावा अबेट झाला आहे. अबेटमेंट सेट असाईडचा आदेश होवून प्रतिवादी क्र.५ वैजयंता तात्याबा कुंभार हिचे वारस रेकॉर्डवर घेणे, या दाव्याचा अंतिम निर्णय गुणावगुणावर होणेसाठी आवश्यक आहे. तसे न झाल्यास वादीचे कधीही कशानेही न भरुन येणारे अपरिमित नुकसान होणार आहे. सदर अबेटमेंट रद्द होवून वारस रेकॉर्डवरती घेणेकरीता झालेला विलंब माफ होणे गरजेचे आहे. सबब, अर्ज मंजूर करण्याची विनंती वादीने केली आहे.

०३. प्रतिवादी क्र.७ ने म्हणणे देवून प्रस्तुत अर्जास हरकत घेतली आहे. सदरचा अर्ज नमुद कारण संयुक्तिक नाही. सुमारे ७ महिन्याचे विलंबाने अर्ज करता येणार नाही. तरी सदरचा अर्ज नामंजुर करावा. यदाकदाचित अर्ज मंजुर केलेस रक्कम रुपये १०००/– कॉस्ट करावी, अशी विनंती केली आहे. प्रतिवादी क्र.१ व ३ यांनी प्रतिवादी क्र.७ चे म्हणण्यास पुष्टी देवून अर्जास हरकत घेतली आहे.

०४. प्रस्तुतचे अर्ज, त्यावरील शपथपत्र व म्हणणे वाचले. वादींतर्फे व प्रतिवादींतर्फे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादीविरुध्द वाटपासाठी व जाहीर ठराव, वाटप व कायमचे ताकीदीसाठी दाखल केला आहे. वादींनी प्रतिवादी क्र.५ वैजयंता तात्याबा कुंभार हिचे मृत्यू प्रमाणपत्राची मूळ प्रत निशाणी २१८ वर दाखल केली आहे. सदर मृत्यू उता–याचे अवलोकन केले असता प्रथमदर्शनी, प्रतिवादी क्र.५ हिचा मृत्यू दिनांक २७.०१.२०२२ रोजी झालेचे दिसून येत आहे. प्रस्तुत दाव्याच्या स्वरुपाचा विचार करता दाव्यामध्ये सर्व आवश्यक पक्षकार सामील

करुन घेणे गरजेचे आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ क्रम ४ चा विचार करता जर प्रतिवादी याचा मृत्यू झाला तर त्याचे वारसांच्या विरुध्द दावा करण्याचा अधिकार वादीला टिकून राहिला तर प्रतिवादीच्या कायदेशीर वारसांना पक्षकार करणे गरजेचे आहे. प्रस्तुत दाव्याचे स्वरुप पाहता दावा मिळकतीबाबत प्रतिवादीचे वारसांविरुध्द दावा करण्याचा अधिकार वादीला आहे, असे दिसून येत आहे. सबब, झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करुन विलंब माफ करणे न्यायोचित होईल. प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यास विलंब झालेचे दिसून येत आहे. त्याकरिता वादीवर खर्च रक्कम रुपये ५००/– लावणे योग्य होईल. यासर्व बाबींचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश –

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. अर्जाचा खर्च रक्कम रुपये ५००/– वादीने प्रतिवादींना द्यावेत.

३. प्रतिवादी क्र.५ वैजयंता तात्याबा कुंभार हिचेविरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात येतो.

४. प्रतिवादी क्र.५ चे वारसांना अभिलेखावर घेणेसाठी झालेला विलंब माफ करण्यात येतो.

Digitally signed by Chetna Yashwant Neware
Date: 2023.01.24 15:22:52 +0530

दिनांकः १९.०१.२०२३. (सी.वाय.नेवारे)
पाटण, जिल्हा सातारा. सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पाटण.